# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१०७५**

**अपिलार्थी श्री. विजय सांगा शियाळ**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून सक्षम प्राधिकारी-२, (टे-४)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
३ रा मजला, ए-विंग, प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार सक्षम प्राधिकारी-२ (टे-४)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
रूम क्र..३०२, ३ रा मजला, ए-विंग, प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०८.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०२३ | १७.११.२०२३/१४.०३.२०२४ | २६.१२.२०२३ | ०२.०२.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.०४.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १७.११.२०२३, १४.०३.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०२.०२.२०२४ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २०.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), वांद्रे- १ यांचे कार्यालयामार्फत आपल्या कार्यालयात पाठविण्यात आलेले श्री. विजय सांगा शियाळ यांचे दि.२८.०२.२०२२ रोजीच्या मुळ अर्जासंबंधीत २ मुद्यांची माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.११.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, माहिती अर्जातील माहिती आपला अर्ज क्र. १/३२ अन्वये पुरविणेत येत आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २६.१२.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०२.२०२४ रोजी अर्जदार यांनी मागणी केलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेऊन माहिती उपलब्ध झाल्यास अपिलार्थीस पुरविण्यात यावी असे आदेशित केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०३.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, या कार्यालयाचे उपलब्ध अभिलेखामध्ये आपण मागणी केलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेतला असता मागणी केलेली माहिती आढळून येत नाही. त्यामुळे मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी विभिन्न कार्यालयात दि. २८.०२.२०२२ रोजी केलेली तक्रार सक्षम प्राधिकारी- २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा यांच्याकडे अग्रेषित करण्यात आली होती व त्यांना त्यांची दि. २८.०२.२०२२ रोजीची तक्रारीची प्रत व अन्य संबंधीत माहिती अपेक्षित आहे.

अपिलार्थी यांनी आयोगास असेही सादर केले की, दि. ०६.०३.२०२३ रोजी सक्षम प्राधिकारी- २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी त्यांचा तक्रार अर्जासंबंधीत झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत क्लस्टर आय डी क्रमांक व नकाशे तयार करण्याची बाब जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई कार्यालयाशी संबंधीत असल्याने सदर पत्राची प्रत त्यांना पाठविलेली आहे. या कारणामुळे जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती अभिलेख उपलब्ध नाही असे उत्तर देणे चुकीचे आहे.

सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांना सक्षम प्राधिकारी- २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र दि. ०६.०३.२०२३ ची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर पत्रात नमुद नस्तीमध्ये तपासून अपिलार्थी यांची तक्रार मुळ स्वरुपात जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांना पाठविण्यात आली किंवा अपिलार्थी यांची तक्रारीची प्रत पाठविण्यात आली याच्या आधारे जन माहिती अधिकारी यांनी आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थींना नोंदणीकृत टपालाने कळवावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास 13-8-2025

**मुंबई**
**दिनांक : १३.०८.२०२५**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**